**नि.फौ.ख.क्र. ११४/२०१८**
**सरकार वि. मो. जलील वगैरे**
**निशाणी क्र.१३**

सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – अश्वीन राहूल साखरकर
वय – ३८ वर्ष धंदा – पोलीस शिपाई ब.नं.७२०७
पत्ता – पोलीस स्टेशन कळमना, नागपूर

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. मी सन २०१६ ते २०२२ पर्यत जुनी कामठी पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. घटना दि.२३/०२/२०१८ रोजी माझी डी.बी. पथकात एनपीसी मनोहर राऊत, रविकांत बंड व पोलीस शिपाई विवेक श्रीपाद यांच्या सोबत सकाळी ९.०० ते रात्री २१.०० वाजेप;zत दिवसपाळी डुयटी होती. आम्ही पोलीस स्टेशन परिसरात पेट्रो वाहनाने गस्त घालीत असतांना एनएच ७ रोड वरील साईनाथ ढाब्याजवळ असतांना सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास आम्हाला नागपूर कडून कामठीच्या दिशेने एक वाहन संशयीतरित्या येत असतांना दिसले. आम्हाला पाहून त्या वाहनाने वेग वाढविला. आम्ही त्याचा पाठलाग करुन खैरी फाटयाजवळ त्याला थांबविले. सदर वाहनाची पाहणी केली असता त्याचा वाहन क्रमांक एमएच–४९–एटी–०६१४ असा होता व त्याच्या मागील डाल्यात गोवंशीय जनावरांचे चामडे दिसून आले. वाहन चालकाला त्याबाबत विचारण केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. आम्हाला असे जाणवले गोवंशीय जनावरांची हत्याकरुन त्यांचे चामडे सदर वाहनातून नेत आहे. आम्ही दोन पंचानामा घटनास्थळी बोलाविले व त्याच्या समक्ष एनपीसी मनोहर राऊत यांनी घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. वाहन चालकाला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव जलील अंसारी असे सांगितले. त्याने सदरच्या गाडीचे मालक शाबीर खान असल्याचे सांगितले व गाडी मालकाच्या सांगण्यावरुन सदर माल शकील अहमद राहणार कामठी यांच्या कडे नेत असल्याचे सांगितले. सदर मालाच्या बिलाबाबत मागणी केली असता त्याच्या कडे कोणतेही बिल मिळून आले. त्यावेळी पंचनाम्याद्वारे २०० चामडे व एक वाहन जप्त करण्यात आले. जप्त चामडयापैकी एका चामडयाचा तुकडा रासयानिक विशलेषणाकरीता पाठविला. तपासी अंमदाराने माझे बयान घेतले. आरोपींना पहिल्यास मी ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण**

**सदर साक्षीदाराचा पुरावा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ अन्वये नोंदविण्यात आला करीता उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.31 12:35:58 +0530

ठिकाण –कामठी
दिनांक –३१/०७/२०२४

**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.